# <u>प्रेस नोट</u>

ला.प्र.वि.,वाशिम.
दि.२३/१०/२०२४

आरोपी लोकसेवक गजानन रतन इंगोले वय-५२ वर्षे पद कनिष्ठ सहायक,पंचायत समिती कार्यालय मालेगाव. रा.गुरुमाउली नगर लाखाळा, सोनखास रोड,वाशिम जि.वाशिम यांना ५,५००/- रुपयेची लाच स्विकारले प्रकरणात गुन्हा नोंद बाबत.

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा, व पत्ता | गजानन रतन इंगोले वय-५२ वर्षे पद कनिष्ठ सहायक,पंचायत समिती कार्यालय मालेगाव. रा.गुरुमाउली नगर लाखाळा, सोनखास रोड,वाशिम जि.वाशिम |
| लाच मागणी रक्कम | ६,०००/-रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५,५००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांच्या वडीलांचे नावे असलेली सिंचन विहिरीच्या खर्चाची फाईल ऑनलाईन करुन शासनाकडुन रक्कम मिळवून देण्याकरीता आलोसे यांनी तक्रारदारास लाचेची मागणी केली. |
| सापळा अधिकारी | बालाजी आर तिप्पलवाड, पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम. |

तक्रारदार यांना त्यांचे वडीलांचे नावे असलेल्या असलेली सिंचन विहिरीच्या खर्चाची फाईल ऑनलाईन करुन शासनाकडुन रक्कम मिळवून देण्याकरीता ६,०००/- रु. लाचेची मागणी केल्याची दि. २१/१०/२०२४ रोजी तक्रार प्राप्त झाली.

दि. २१/१०/२०२४ रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्या वडीलांचे नावे असलेली सिंचन विहिरीच्या खर्चाची फाईल ऑनलाईन करुन शासनाकडुन रक्कम मिळवून देण्याकरीता ६०००/- रु लाचेची मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शवील्याचे निष्पन्न झाले.

दि. २३/१०/२०२४ रोजी सापळा कार्यवाहीचे आयोजन केले असता आलासे गजानन इंगोले यांनी तक्रारदार यांच्या कडून तडजोडअंती लाच रक्कम ५,५००/- रुपये स्विकारल्याने आरोपी लोकसेवक यांना रंगेहाथ पकडण्यात आले असुन त्यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन मालेगाव जि. वाशिम येथे गुन्हा नोंदविण्याची कार्यवाही चालु आहे.

सदर कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. मारोती जगताप, अपर पोलीस अधिक्षक सचिंद्र शिंदे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परीक्षेत्र अमरावती,पोउपअधि गजानन शेळके लाप्रवि वाशिम यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक बालाजी तिप्पलवाड व अंमलदार पोहवा. विनोद मारकंडे,आसिफ शेख,पोना.योगेश खोटे,चापोकॉ नावीद शेख ला.प्र.वि. वाशिम यांनी केली आहे.शासकीय लोकसेवकाने किंवा खाजगी इसमाने शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत खालील क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन बालाजी तिप्पलवाड पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम यांनी केले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम दुरध्वनी क्रमांक- ०७२५२/२३५९३३
टोल फ्रि.नं. - १०६४
बालाजी आर तिप्पलवाड -७०२०१५५३११

( बालाजी आर तिप्पलवाड )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम.